| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| MHRG100007992025 | दाखल तारीख | : | ०३/१०/२०२५ | | |
| | नोंदणी तारीख | : | ०३/१०/२०२५ | | |
| | निकाल तारीख | : | ०७/०८/२०२६ | | |
| | कालावधी | : | वर्ष | महिना | दिवस |
| | | | ०० | १० | ०४ |

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. <u>४८६/२०२५</u> याचा अभिलेख.**
**श्रीमती.पी.एस.माळी, न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, महाड, जिल्हा रायगड यांचे न्यायालयात**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अपराध घडल्याचा दिनांक | : | ३०/०९/२०२५ |
| २) | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | : | ०१/१०/२०२५ |
| ३) | फिर्यादीचे नांव, त्याच्या आई व वडीलांचे नांव, त्याचे वय व त्याचे निवासस्थान, इ. | : | महाराष्ट्र शासन (व्दारा : महाड शहर पोलीस ठाणे) |
| ४) | आरोपीचे नांव, आरोपीच्या आई व वडीलांचे नांव, त्याचे वय व त्याचे निवासस्थान, इ. | : | शकील अहमद याकूब अहमद अनसारी, वय: ३८ वर्ष,धंदा: व्यवसाय, रा : इसाने कांबळे, सलामभाई यांचे रूममध्ये, ता. महाड, जि. रायगड |
| ५) | ज्याबद्दल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपीला समजावून सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशील | : | |

दिनांक ३०/०९/२०२५ रोजी सायंकाळी ६.३० वाजताचे सुमारास यातील आरोपी याने महाड शहरातील जिजामाता उद्यानासमोरील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते महाड एस. टी. स्टॅंडकडे जाणाऱ्या सार्वजनिक रस्त्यावर त्याचे ताब्यातील टेम्पो क्र. एम.एच.–१२–डब्ल्यु.जे.–५०३१ उभा करून रहदारीस व वाहतुकीस अडथळा निर्माण करून महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १०२ चा भंग केला म्हणुन त्याच्यावर महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ११७ अन्वये गुन्हा

केल्याचा आरोप आहे.

PUJA SANKET MALI Digitally signed by PUJA SANKET MALI Date: 2026.08.07 13:04:57 +0530

**महाड.** **( पी.एस.माळी )**
**दिनांक : ०७/०८/२०२६** **न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग, महाड.**

| | | |
|---|---|---|
| प्रश्न १) | : | तुम्हाला पोलीस टिपणाच्या नकला मिळाल्या का ? |
| उत्तर | : | होय. |
| प्रश्न २) | : | तुमच्यावर ठेवलेला आरोप तुम्हाला वाचून दाखविला व समजावून सांगितला तो तुम्हाला समजला का ? |
| उत्तर | : | होय. |
| प्रश्न ३) | : | तुम्हाला गुन्हा कबूल आहे का ? |
| उत्तर | : | होय. मला गुन्हा कबूल आहे. |

.....................

**(आरोपीची सही)**

**समक्ष**

PUJA SANKET MALI Digitally signed by PUJA SANKET MALI Date: 2026.08.07 13:05:01 +0530

**महाड.** **( पी.एस.माळी )**
**दिनांक : ०७/०८/२०२६** **न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग, महाड.**

## न्यायनिर्णय

दिनांक ३०/०९/२०२५ रोजी सायंकाळी ६.३० वाजताचे सुमारास यातील आरोपी याने महाड शहरातील जिजामाता उद्यानासमोरील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते महाड एस. टी. स्टॅंडकडे जाणाऱ्या सार्वजनिक रस्त्यावर त्याचे ताब्यातील टेम्पो क्र. एम.एच.—१२—डब्ल्यु.जे.—५०३१ उभा करून रहदारीस व वाहतुकीस अडथळा निर्माण करून महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १०२ चा भंग केला म्हणुन त्याच्यावर महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ११७ अन्वये गुन्हा केल्याचा आरोप आहे.

आरोपीने सदर गुन्हयाची कबूली दिली, पुरशिस निशाणी क्र. २ अन्वये व आधारकार्डची पडताळीत प्रत निशाणी क्र. ३ अन्वये दाखल केली

आहे. सदर पुरशिसवरून त्याची गुन्हा कबुलीची पडताळणी करणेत आलेली आहे. सदरचा गुन्हा हा त्याचा पहिलाच गुन्हा आहे. तसेच सदर गुन्हा त्याच्याकडून अनावधानाने झालेला आहे असे कथन केले. तसेच त्याने यापुढे सुधारण्याची इच्छा व्यक्त केली. आरोपीने पुढे असे कथन केले तो घरातील एकमेव कर्ता पुरूष असून, घरातील इतर व्यक्ती त्याच्यावर अवलंबून आहेत. त्यामुळे त्यास कमीत कमी शिक्षा द्यावी अशी विनंती केली आहे

आरोपी व सहाय्यक सरकारी वकील श्री. डी. व्ही. गायकवाड यांचे म्हणणे ऐकुन घेतले. गुन्हयाचे स्वरूप व सदर गुन्हयास असलेली शिक्षेची तरतूद व आरोपीचा कबूली जबाब व शिक्षा कमी देणेबाबत दिलेले म्हणणे विचारात घेतले असता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. आरोपी नामे शकील अहमद याकूब अहमद अनसारी यांना भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७५ अन्वये महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १०२/११७ या गुन्हयाकरीता दंड रक्कम रूपये ७००/— अशी शिक्षा देण्यात येत आहे. आरोपीने दंड न भरल्यास त्याने ८ दिवस साध्या कारावासाची शिक्षा भोगावयाची आहे.

PUJA SANKET MALI
Digitally signed by PUJA SANKET MALI
Date: 2026.08.07 13:05:08 +0530

**महाड.** **( पी.एस.माळी )**
**दिनांक : ०७/०८/२०२६** **न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग, महाड.**